Vishweshwar, 31/03/2025

# आंबा हंगाम २०२५ मध्ये कृषि पणन मंडळामार्फत पुण्यात चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन

**पुणे :** राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी बैठक घेऊन राज्यातील आंबा उत्पादकांना थेट विक्री करता यावी यासाठी राज्यात विविध भागात आंबा महोत्सवांचे आयोजन करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे सलग २४ वे वर्ष आहे.

चालूवर्षी दि.१ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत 'आंबा महोत्सव-२०२५' चे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने मार्केटयार्ड येथे तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री.संजय कदम यांनी सांगितले. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागातील ग्राहकांची सोय होणार आहे.

सदर महोत्सव ३१ मे पर्यंत चालू असणार आहे. तरी कोकणातील उच्च प्रतिच्या हापूस आंब्याचा तसेच राज्याच्या विविध भागातील केशर आंब्याचा लाभ ग्राहकांनी अवश्य घ्यावा असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक श्री. विनायक कोकरे यांनी केले.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-03-31 | Page- 2

# पुण्यात उद्यापासून आंबा महोत्सव

## ‘राज्य कृषी पणन मंडळा’मार्फत दि. ३१ मेपर्यंत आयोजन

**पुणे, दि. ३० : प्रतिनिधी**

राज्याचे पणन आणि राजशिष्टाचारमंत्री ना. जयकुमार रावल यांनी दिलेल्या सूचनेनुसार आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने ‘उत्पादक ते थेट ग्राहक’ संकल्पनेनुसार ‘महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा’मार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी पुण्यात दि. १ एप्रिल ते दि. ३१ मे या कालावधीत ‘आंबा महोत्सव-२०२५’चे आयोजन ‘महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ’, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने मार्केटयार्ड येथे तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि



खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे.

‘‘कृषी पणन मंडळा’मार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील ‘जीआय’ मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,’’ असे ‘कृषी पणन मंडळा’चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

**या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल**

तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्यांची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागांतील ग्राहकांची सोय होणार आहे. हा महोत्सव दि. ३१ मे रोजीपर्यंत चालू असणार आहे, तरी कोकणातील उच्च प्रतीच्या हापूस आंब्याचा तसेच राज्याच्या विविध भागांतील केसर आंब्याचा लाभ ग्राहकांनी अवश्य घ्यावा, असे आवाहन ‘पणन मंडळा’चे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले.

सामना



## पणन मंडळाकडून उद्यापासून 'आंबा महोत्सव'

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत शहरात मार्केटयार्ड, गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडीत मंगळवारपासून (दि. १) आंबा महोत्सव सुरू होणार आहे. हा महोत्सव ३१ मे पर्यंत सुरू राहील, अशी माहिती पणन मंडळाकडून देण्यात आली. पणनमंत्री जयकुमार रावल यांनी 'आंबा महोत्सवा'बाबत नुकतीच बैठक घेतली होती. त्यामध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना आंबा विक्री करता यावा, यासाठी राज्याच्या विविध भागांत 'आंबा महोत्सवा'चे आयोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिलेल्या आहेत. त्यानुसार पुण्यात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केटयार्ड येथे विक्री केंद्र येथे ६० स्टॉल्स, गांधी भवन-कोथरूड येथे २० स्टॉल्स, मगरपट्टा-हडपसर येथे २० स्टॉल्स आणि खराडीत २० स्टॉल्स आहेत. 'आंबा महोत्सवा'त जीआय मानांकनप्राप्त शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

सामना

Pune Edition
Mar 31, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

सकाळ

# पणन मंडळाचा आंबा महोत्सव उद्यापासून

**मार्केट यार्ड, ता. ३० :** राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आंबा महोत्सवास शहरात एक एप्रिलपासून सुरुवात होत आहे. आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक या उपक्रमातून शहरातील चार ठिकाणी आंबा विक्री केंद्रे सुरू होत आहेत. हा महोत्सव ३१ मेपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती पणन मंडळाकडून देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केट यार्ड (६० स्टॉल), गांधी भवन-कोथरूड (२० स्टॉल), मगरपट्टा-हडपसर (२० स्टॉल) आणि खराडीत (२० स्टॉल) विक्री केंद्र आहेत. महोत्सवात एकूण चार ठिकाणी १२० स्टॉल्सद्वारे आंबा विक्रीची व्यवस्था केली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन तथा जीआय (जिओग्राफिकल इंडिकेशन) मानांकन मिळालेल्या हापूस आंब्यासह केशर व पायरी आंबे व इतर वाणांचा आंबा खरेदीची संधी पुणेकर ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.



आंबा उत्पादक शेतकरी व ग्राहक यांचा थेट संपर्क व्हावा, यासाठी राज्याच्या विविध भागांत महोत्सवाचे आयोजन करण्याच्या सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या आहेत. आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार पणन मंडळामार्फत दरवर्षी हा महोत्सव होतो. यंदा महोत्सवाचे २४ वे वर्ष आहे. तरी ग्राहकांनी आंबा खरेदीचा लाभ घेण्याचे आवाहन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

“ कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचे नाव बदनाम होते; पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- **संजय कदम**, कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ.

Rashtraroop, 31/03/2025

# कृषि पणन मंडळामार्फत पुण्यात चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन

**पुणे :** राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी बैठक घेऊन राज्यातील आंबा उत्पादकांना थेट विक्री करता यावी यासाठी राज्यात विविध भागात आंबा महोत्सवांचे आयोजन करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे सलग २४ वे वर्ष आहे.

चालूवर्षी दि.१ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत 'आंबा महोत्सव–२०२५' चे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने मार्केटयार्ड येथे तसेच गांधी भवन– कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री.संजय कदम यांनी सांगितले. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन–कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागातील ग्राहकांची सोय होणार आहे.

Lokmanya Sanjwarta, 31/03/2025

Date of Publication सोमवार, दि. ३१ मार्च २०२५ आर.एन.आय. नं. ७०१११/१९९९ रजि. नं. पी. सी. डब्ल्यू/००९

# कृषि पणन मंडळामार्फत पुण्यात चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन

**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री मा.ना.श्री. जयकुमार रावल यांनी बैठक घेऊन राज्यातील आंबा उत्पादकांना थेट विक्री करता यावी यासाठी राज्यात विविध भागात आंबा महोत्सवांचे आयोजन करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे सलग २४ वे वर्ष आहे.

चालूवर्षी दि. १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत 'आंबा महोत्सव-२०२५' चे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने मार्केटयार्ड येथे तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले



आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते.

त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा- हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भगातील ग्राहकांची सोय होणार आहे.

सदर महोत्सव ३१ मे पर्यंत चालू असणार आहे. तरी कोकणातील उच्च प्रतिच्या हापूस आंब्याचा तसेच राज्याच्या विविध भागातील केशर आंब्याचा लाभ ग्राहकांनी अवश्य घ्यावा असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी

# कृषी पणन मंडळाकडून आंबा महोत्सव



**पुणे :** आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत पुण्यात चार ठिकाणी १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यातील आंबा उत्पादकांना थेट विक्री करता यावी, यासाठी पुण्यासह राज्यांच्या विविध भागात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्याच्या सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्याचे कृषी पणन कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले. या महोत्सवासाठी रत्नागिरी, सिंधूदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी, तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे.

कोकणातील हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचे नाव बदनाम होत आहे. मात्र, आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवात देखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे कदम यांनी सांगितले.

पुण्यातील आंबा महोत्सव मार्केट यार्ड परिसरातील जिल्हा परिषदेच्या जागेवर ६० स्टॉल, गांधी भवन (कोथरुड), मगरपट्टा (हडपसर) आणि खराडी येते प्रत्येकी २० असे ६० स्टॉलद्वारे आंब्याची विक्री करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागांतील ग्राहकांची सोय होणार आहे. दरम्यान, कोकणातील हापूस आंब्याबरोबरच राज्याच्या विविध भागातील केशर आंब्याचा लाभ ग्राहकांनी अवश्य घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

# युनिक कोड, रंग, आकार, गंधावरून ओळखवा खरा देवगड हापूस

## गुढीपाडव्याला शुभारंभ : देवगड तालुक्यातील जीआय रजिस्टर शेतकऱ्यांना टॅपलप्रूफ यूआयडी

**कणकवली : अजित सावंत**

संडे स्पेशल

फळांचा राजा आंबा म्हटले की, डोळ्यांसमोर येतो तो देवगडचा हापूस आंबा. गेल्या काही वर्षांपासून याच देवगड हापूसच्या नावाखाली अन्य जातीचे आंबे माथी मारून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. ही फसवणूक टाळण्यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेमार्फत जीआय रजिस्टर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना यूआयडी युनिक कोड दिला आहे. या कोडच्या माध्यमातून देवगड हापूसची खात्री ग्राहकांना पटवून अस्सल चव चाखता येत आहे.

गुढीपाडव्याला आंब्याची पारंपरिकपणे पूजा करून आंबा बाजारात विक्रीसाठी उत्पादकांकडून पाठविला जातो. सध्या बाजारात



काही प्रमाणात हापूस आंबा विक्रीसाठी आला आहे. दुसऱ्या टप्प्यातील आंब्याचा सिझन आता सुरू होऊन एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात आंब्याची आवक वाढेल, असे सांगण्यात आले. सध्या देवगडमध्ये पिकलेल्या हापूस आंब्याचा दर ८०० ते १,५०० रुपये डझन, तर हिरव्या आंब्याचा दर ७०० ते १,२०० रुपये डझन आहे. मात्र, बऱ्याचवेळा सिंधुदुर्गातील वर्तमानपत्रांच्या रद्दीमध्ये कर्नाटकी आंबे पॅक करून देवगड हापूसच्या नावाखाली विकले जातात. यामध्ये ग्राहकांची फसवणूक होते. पण, युनिक कोड नसेल तर देवगड हापूस बाहेरून ओळखावा तरी कसा? असा प्रश्न ग्राहकांना पडतो. देवगड हापूस आंबा काहीसा गोलाकार, वरून तांबूस-पिवळसर आणि कडक असतो; मात्र त्याची साल पातळ असते. देवगड हापूसमध्ये रसाचे प्रमाण फार कमी असते. तो खाल्ल्यानंतर त्याची चव लगेच समजते आणि सुगंधही पटकन येतो; तर कर्नाटकी आंब्याची साल काहीशी जाडसर, वरून पिवळसर आणि खालून हिरवट, आकार काहीसा उभट असतो. या आंब्याला सुगंध येत नाही आणि चवही तितकीशी नसते. यासाठी ग्राहकांनी चोखंदळपणे तो तपासून घेणे आवश्यक असल्याचे आंबा उत्पादक सांगतात.

### आता जावे आंब्याच्या गावा

ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी यंदापासून देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेमार्फत जीआय रजिस्टर शेतकऱ्यांना टॅपलप्रूफ यूआयडी युनिकोड दिले आहेत. आंब्यावर चिकटवलेला हा युनिक कोड दोन तुकड्यात असतो. पहिल्यावर व्हॉटस्‌ॲप नंबर असतो, तर वरचा भाग काळ्या रंगाचा असतो. त्या व्हॉटस्‌ॲप नंबरवर हाय पाठवले की, सिस्टीम काळ्या स्टीकरच्या मागे असलेला डिजिटल नंबर मागते. तो नंबर टाकला आणि सिस्टीम व्हेरीफाय झाली की, त्या उत्पादकाचे नाव, जीआय नंबर, गाव अशी सर्व माहिती मिळते. जेणेकरून तो देवगड हापूसच असल्याची खात्री मिळते.



Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# पणन आंबा महोत्सव १ एप्रिलपासून

- शहरात चार ठिकाणी आंबा विक्री केंद्रे सुरू राहणार
- उत्पादक ते थेट ग्राहक उपक्रमातून आंबा खरेदीची ग्राहकांना संधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने यंदाच्या आंबा महोत्सवास शहरात एक एप्रिलपासून सुरुवात होत आहे. तसेच आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक या उपक्रमातून शहरातील चार ठिकाणी आंबा विक्री केंद्रे सुरू होत असून ३१ मेपर्यंत आंबा विक्री सुरू राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केट यार्ड येथे विक्री केंद्र (६० स्टॉल) राहील. या शिवाय गांधी भवन-कोथरूड (२० स्टॉल), मगरपट्टा-हडपसर (२० स्टॉल) आणि खराडीत (२० स्टॉल) मिळून एकूण चार ठिकाणी १२० स्टॉल्सद्वारे आंबा विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भौगोलिक मानांकन तथा जीआय (जिओग्राफिकल इंडिकेशन) मानांकन मिळालेल्या हापूस आंब्यासह केशर व पायरी आंबे व इतर वाणांचा आंबा खरेदीची संधी पुणेकर ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे सलग २४ वे वर्ष आहे. तरी ग्राहकांनी आंबा खरेदीचा लाभ घेण्याचे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

## राज्यातही आंबा महोत्सव भरवा : पणनमंत्री

पणन आणि राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांनी आंबा महोत्सवाबाबत नुकतीच बैठक घेतली होती. त्यामध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना आंबा विक्री करता यावा, यासाठी राज्याच्या विविध भागात आंबा महोत्सवांचे आयोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिलेल्या आहेत.

> कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचे नाव बदनाम होते. पण, आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे, ही बाब विचारात घेऊन, पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> - **संजय कदम,** कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ.

Agrowon, 30/03/2025

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास मंगळवारी प्रारंभ

ॲग्रोवन वृत्तसेवा

आंबा हंगामात ग्राहकांना अस्सल हापूस उपलब्ध व्हावा, आणि शेतकऱ्यांना रास्त दर मिळावा, या उद्देशाने राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या आंबा महोत्सवाला मंगळवारी (ता. १) प्रारंभ होत आहे. मात्र गुढीपाडव्याला ग्राहकांची मागणी वाढल्यामुळे शनिवारी (ता. २९) महोत्सवस्थळी आंब्याची विक्री सुरू झाली आहे. कोकणातून काही शेतकरी दाखल झाले असून, विक्री सुरू केली आहे. महोत्सवात प्रति डझनला साधारण दीड ते दोन हजार रुपये आहेत.

पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी मार्केट यार्ड बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवात १०० पेक्षा अधिक स्टॉल लावण्यात आले असून, हा महोत्सव पुढील एक महिना सुरू असणार आहे. महोत्सवात कोकणातील सिंधुदुर्ग. रत्नागिरी जिल्ह्यांमधून हापूससह केसर आंबा विक्रीसाठी आणला जातो. तसेच पुणे जिल्ह्यातील काही महिला बचत गटाच्या उत्पादन विक्रीसाठी स्टॉल दिले जातात. या वर्षीच्या महोत्सवाला मंगळवारी (ता. १) प्रारंभ होत असला तरी, गुढीपाडव्या निमित्त शनिवार (ता. २९) पासूनच विक्री सुरू झाली आहे.

## या ठिकाणी महोत्सवाचे आयोजन

या वर्षी मार्केट यार्डसह कोथरूड (गांधी भवन), खराडी, मगरपट्टा (हडपसर) या ठिकाणी आंबा महोत्सव होणार असल्याचे सुहास काळे यांनी सांगितले.




**पुणे : ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी यंदा आंबा महोत्सवात क्यूआर कोडची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# राज्यात बाजार समित्यांमध्ये 'स्वच्छ बाजार आवार अभियान'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आवार स्वच्छ करण्याची मोहीम पुढील १०० दिवसांत राबविण्याचे पणन विभागाने निश्चित केलेले आहे. हे अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी बाजार समितीतील सर्व संचालक मंडळ, अधिकारी- कर्मचारी, अडते- व्यापारी, हमाल- तोलणार व इतर सामाजिक संस्थांचा सहभाग या अभियानामध्ये घेण्याच्या परिपत्रकीय सूचना पणन संचालक विकास रसाळ यांनी सर्व बाजार समित्यांना नुकत्याच दिल्या आहेत.

राज्यामध्ये एकूण ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या असून, ६२३ उपबाजार आहेत. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी १०० दिवसांचा विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आहेत. त्यानुसारच पणन विभागाने स्वच्छ बाजार आवार अभियानाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

स्वच्छ बाजार आवार अभियानाची तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी योग्य ती कार्यवाही करावी व तसा अहवाल पणन संचालनालयास सादर करावा. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या बाजार समित्यांना विभागनिहाय पुरस्कार देण्यात येणार आहे. बाजार समित्यांनी स्वच्छ अभियान राबविल्यानंतर याबाबत तपासणी करण्यासाठी राज्यस्तरीय समितीची नेमणूक केली आहे. ही समिती बाजार समित्यांना भेट देऊन स्वच्छ बाजार अभियानाची पाहणी करणार आहे. त्यानंतर प्रत्येक विभागातील तीन बाजार समित्यांना पुरस्कार देण्यासाठी शिफारस करणार आहे. शेतमालाच्या खरेदी-विक्रीनंतर बाजार समितीच्या आवारामध्ये मोठ्या प्रमाणात घनकचरा, पालापाचोळा, निर्माल्य संचित होत असते. आवारात मोठ्या प्रमाणात कचरा पडल्याने या सर्व घटकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असतो. त्यादृष्टीनेही या अभियानास महत्त्व आहे.

- **शंभर दिवसांच्या कार्यक्रमात पणन संचालनालयाचा पुढाकार**
- **प्रत्येक विभागातील तीन बाजार समित्यांना मिळणार पुरस्कार**

## स्वच्छ बाजार आवार अभियानाबाबतची प्रक्रिया

- अभियानाची सुरुवात करताना तालुकास्तरावर तहसीलदार, सहकार विभागाचे सहायक निबंधक व जिल्हास्तरावरील बाजार समित्यांमध्ये जिल्हाधिकारी, सहकारचे जिल्हा उपनिबंधक, महापालिका आयुक्तांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात यावा.
- हा कार्यक्रम बाजार समितीच्या सुटीच्या दिवशी आयोजित करण्यात यावा; जेणेकरून बाजार समितीमध्ये शेतमालाच्या खरेदी-विक्रीमध्ये व्यत्यय येणार नाही.
- या अभियानामध्ये भाग घेणाऱ्या सर्व घटकांना हातमोजे, झाडू, मास्क, कचरा उचलण्यासाठी व वाहण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री बाजार समितीमार्फत पुरविण्यात यावी.
- या अभियानासंदर्भात व्यापक प्रमाणावर प्रचार-प्रसिद्धी करण्यासाठी सोशल मीडिया, होर्डिंग्ज, प्रिंट मीडिया इत्यादीचा वापर करण्यात यावा. स्वच्छता अभियानामध्ये भाग घेणाऱ्या कामगार, कर्मचारी व सर्व घटकांना चहा, पाणी, नाष्ट्याची व्यवस्था करण्यात यावी.

Pune Gramin Edition
Mar 27, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

सकाळ अ‍ॅग्रोवन २
बुधवार, २६ मार्च २०२५

# खानदेशातून आखातात केळी निर्यातीत वाढ

## बॉक्समध्ये पॅकिंग करून दररोज १४ ते १६ कंटेनर निर्यात

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

जळगाव : खानदेशातून आखातसह अन्य भागांत केळीची पाठवणूक गती घेत आहे. दर्जेदार केळी काढणीवर असून, रोज १४ ते १६ कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात सध्या होत आहे.

निर्यातीच्या केळीचे दर मागील महिनाभरापासून स्थिर आहेत. परंतु दरात काहीशी घसरणही झाली आहे. मध्यंतरी निर्यातीच्या केळीचे दर २३०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत होते. सध्या २१०० ते १९०० रुपये प्रतिक्विंटलचा दर निर्यातीच्या केळीस मिळत आहे. सध्या धुळ्यासह नंदुरबार, जळगाव जिल्ह्यांतून केळीची निर्यात होत आहे. सुमारे १५ कंपन्या निर्यातक्षम केळीची खरेदी जागेवर करीत असून, शेतातच प्रतवारी, स्वच्छता व बॉक्समध्ये पॅकींग करून केळीची पाठवणूक आखातात केली जात आहे.

नंदुरबारातून रोज पाच कंटेनर, धुळ्यातून तीन आणि जळगाव जिल्ह्यातून चार ते सहा कंटेनर केळीची निर्यात परदेशात होत आहे. मागील हंगामात निर्यातीच्या केळीचे दर मार्चमध्ये १४०० ते १६०० रुपये प्रतिक्विंटल, असे होते. परंतु यंदा दर बऱ्यापैकी आहेत. जळगाव जिल्ह्यातून चोपडा, यावल, रावेर व मुक्ताईनगरात निर्यातक्षम केळी अधिक आहे. धुळ्यातील शिरपूर आणि नंदुरबारात शहादा तालुक्यात निर्यातक्षम केळी अधिक आहे.



### बऱ्हाणपूर येथे आवक

मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर बाजार समितीमधील दरांनुसार खानदेशात केळीची दर निश्चित होतात. तेथे आवक मध्यंतरी कमी होती. यामुळे कमाल दर किंवा दर्जेदार केळीचे दर २००० ते २१०० रुपये प्रतिक्विंटल, असे होते. परंतु तेथील आवकेत मागील चार ते पाच दिवसांत मोठी वाढ झाली असून, तेथील केळी दरपातळी कमाल १५५० रुपयांपर्यंत खाली आली आहे. दर किमान दर ८०० रुपये प्रतिक्विंटल, असे आहेत. बऱ्हाणपुरात केळीची आवक प्रतिदिन ८० ट्रक (एक ट्रक १६ टन क्षमता) एवढी आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# रत्नागिरीत होणार भव्य 'मँगो पार्क'

## भूसंपादनासाठी एमआयडीसीकडे ४०० कोटींच्या निधीची मागणी

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

**रत्नागिरी जिल्ह्यात लवकरच भव्य मँगो पार्क साकारणार आहे. निवेंडी येथे त्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यासह नव्या एमआयडीसीसाठी आवश्यक चारशे कोटींच्या निधीची मागणी प्रशासनाने एमआयडीसीकडे केली आहे.**

अडीच वर्षांपूर्वी राज्याचे उद्योगमंत्रिपद मिळाल्यानंतर रत्नागिरीमध्ये मँगो पार्क, तर दापोलीतील हर्णे येथे फिश पार्क उभारण्याची घोषणा उदय सामंत यांनी केली होती. त्यादृष्टीने निवेंडी येथे मँगो पार्क उभारण्यासाठी हालचालीही सुरू झाल्या आहेत. यासाठी १०४ हेक्टर जमिनीचे भूसंपादन केले जाणार असून, त्याची मोजणीही पूर्ण झाली आहे. यासाठी १४४.९९ कोटी रुपयांची मागणी प्रशासनाने एमआयडीसीकडे केली आहे. या जागेचे अंतिम नोटिफिकेशनही निघाले आहे. याचप्रमाणे रिळउंडी येथेही प्रकल्प उभारला जाणार असून, या ठिकाणी २०५ हेक्टर जागेचे भूसंपादन होणार आहे. या ठिकाणीही मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, त्यासाठी २५४ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकल्पांमुळे जवळपास ४० हजारहून अधिक रोजगार उपलब्ध होणार आहेत. पुढील पाच वर्षांत त्यामुळे रत्नागिरीचा कायापालट होण्यास मदत होणार आहे.

- **'मँगो पार्क'साठी १०४ हेक्टर जमिनीचे भूसंपादन**
- **प्रकल्पांमुळे सुमारे ४० हजारांहून अधिक रोजगार उपलब्ध होणार**



### काय असेल 'मँगो पार्क'मध्ये?

या मँगो पार्कमध्ये आंब्यावर आधारित पूरक प्रक्रिया उद्योग उभारणार आहे. आंबा कॅनिंग, ग्रीडिंग असे प्रकल्प यात होणार आहेत. कोकणातील आंब्यांच्या वैशिष्ट्याची माहिती देणार आहेत. आंबा प्रक्रियावर आधारित उद्योगांना एकत्रित आणण्यात येणार आहे.

**सेमीकंडक्टरसाठी शिरगाव एमआयडीसीत जाग**

रत्नागिरीमध्ये वाटद एमआयडीसीत हत्यारांचा तर रत्नागिरीत सेमीकंडक्टर प्रकल्प प्रस्तावित आहे या सेमीकंडक्टर प्रकल्पाचा दुसरा टप्पा रिळउंडी परिसरात होणार आहे. उद्यागमंत्री उदय सामंत यांनी या सेमीकंडक्टर प्रकल्पासाठी शिरगाव एमआयडीसीत जागा उपलब्ध करून दिली आहे.

अॅग्रोवन

# चार हजार टन आंबा निर्यातीचे 'पणन'चे उद्दिष्ट

## यंदा अर्जेंटिनामध्ये पहिल्यांदाच होणार निर्यात

गणेश कोरे : अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : आंब्याला जागतिक बाजारपेठ मिळावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध देशांमध्ये आंबा निर्यातीचे नियोजन केले जाते. तर दरवर्षी एक नवीन देश निर्यातीसाठी खुला केला जातो. पणन मंडळाच्या वतीने नियोजन सुरू झाले असून, या वर्षी विविध देशांमध्ये सुमारे ४ हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर अर्जेंटिना देशामध्ये प्रथमच निर्यात व्हावी यासाठीचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

कदम म्हणाले, "पणन मंडळाच्या वतीने राज्यातील शेतीमाल निर्यातीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. यासाठी राज्यातील कृषी हवामान विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रे उभारण्यात आली आहेत. या माध्यमातून विविध देशांच्या निर्यात प्रोटोकॉलनुसार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वर्षीचा आंबा हंगाम लवकरच सुरू होत असून त्यानुसार विविध निर्यात केंद्रे सज्ज करण्यात आली आहेत.

पान ४ वर »



"हवामान बदल, जागतिक तापमान वाढीच्या संकटाचा सामना करत, आंबा निर्यात हंगामाची तयारी झाली आहे. पणन मंडळाच्या वतीने जास्तीत जास्त आंबा विविध देशांना निर्यात होण्यासाठी विविध सुविधा आणि प्रोटोकॉल तयार करण्याच्या सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या आहेत. त्यानुसार सर्व सुविधा सज्ज असून, पणन मंडळ, शेतकरी आणि निर्यातदार यंदाच्या हंगामासाठी उत्सुक आहोत.

- संजय कदम,
कार्यकारी संचालक,
राज्य कृषी पणन मंडळ

सकाळ अॅग्रोवन
शनिवार, २२ मार्च २०२५


# चार हजार टन आंबा निर्यातीचे ‘पणन’चे उद्दिष्ट

» पान १ वरून

या विविध केंद्रांवर उष्णजल प्रक्रिया, व्हेपर हिट ट्रीटमेंट, विकिरण प्रक्रिया आदी विविध प्रक्रियांच्या चाचण्या झाल्या असून, लवकरच निर्यात सुरू होणार आहे.''

अमेरिकेचे निर्यात प्रोटोकॉल सेट झाले असून, त्यांचे इन्सपेक्टर एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात दाखल होऊन, निर्यात सुरू होईल. गेल्या वर्षीपासून समुद्रमार्गे यशस्वी आंबा निर्यात झाली होती. यामुळे कमी खर्चात या वर्षी आंबा निर्यातीसाठी निर्यातदार आग्रही राहण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने अमेरिका निर्यातदारांची तयारी सुरू आहे, असे कदम यांनी सांगितले.

### देशनिहाय उद्दिष्ट

| देश | टन |
|---|---|
| युरोपियन देश | १७१० |
| अमेरिका | १३०० |
| ऑस्ट्रेलिया | ७५ |
| जपान | ७० |
| दक्षिण कोरिया | १० |
| न्यूझीलंड | २०० |
| अर्जेंटिना | १० |
| मलेशिया | १० |
| कॅनडा, सिंगापूर, हाँगकाँग आणि आखाती देश | २०० |

यंदाच्या हवामान बदलांचे संकट हंगामावर आहे. तरी अमेरिकेतून असलेली मागणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तर समुद्रमार्गे दर कमी असले तरी हौती दहशतवाद्यांच्या सावटामुळे जहाजांना आपला मार्ग दक्षिण आफ्रिकामार्गे वळवावा लागत आहे. यामध्ये चाळीस दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे विमानमार्गे दुसऱ्या दिवशी आंबा अमेरिकेच्या बाजारपेठेत पोहोचत आहे. यामुळे खर्च जास्त असला तरी विमानमार्गे आंबा पाठविणार आहोत, असे आंबा निर्यातदार रेन्बो इंटरनॅशनलचे अभिजित भसाळे यांनी सांगितले.

> “ या वर्षीच्या अमेरिका आंबा निर्यातीसाठीची तयारी सुरू आहे. १ ते २ एप्रिलला अमेरिकेचे इन्स्पेक्टर आल्यानंतर तांत्रिकबाबींची पूर्तता करून निर्यात सुरू होईल. गेल्या वर्षी आम्ही ५५० टन हापूस आंबा निर्यात केला होता. या वर्षी ७५० टनांची तयारी केली आहे.
>
> **- अभिजित भसाळे,**
> आंबा निर्यातदार,
> रेन्बो इंटरनॅशनल

पणन मंडळाच्या बारामती येथील निर्यात सुविधा केंद्रावर उष्णजल प्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधा केंद्रावरून अमेरिका, ऑस्ट्रेलिया देशांसह युरोपियन देश आणि इंग्लंडसाठी यावर्षी २५० टन निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

वाशी आणि जामसंडे ही आंबा निर्यातीची प्रमुख केंद्रे असून, वाशी येथे विकिरण सुविधा उपलब्ध आहे. तर जामसंडे येथे उष्णजल प्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मस्ट READ

Lokmat, 21/03/2025

# ... असा ओळखा देवगड हापूस आंबा !

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देवगड हापूसच्या नावाने होणारी तोतयागिरी व बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी 'हापूस (अल्फोन्सो)' च्या भौगोलिक संकेत युनिक आयडीद्वारे जीआय टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर प्रणाली बनवली आहे. यामुळे आता नैसर्गिक उत्पादन असलेला खरा देवगड आंबा ओळखता येणार आहे. या युनिक आयडी कोड प्रणालीद्वारे देवगड आंब्यांची गोड चव ग्राहकांना चाखता येणार आहे.

देवगड हापूसच्या नावाखाली होणारी फसवणूक पूर्णतः बंद होईल. ग्राहकांना अस्सल देवगड हापूस ओळखता येईल.

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅपर प्रूफ युआयडी सील' सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नैसर्गिक देवगड आंबा ओळखता येणार आहे, अशी माहिती देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेचे संचालक सदस्य ॲड. ओंकार सप्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा खास युनिक स्टिकर लावणे बंधनकारक असेल आणि असे युआयडी असलेले आंबेच 'देवगड हापूस' किंवा 'देवगड अल्फोन्सो' म्हणून विक्री करता येणार आहे.



## युनिक कोड सक्तीचे करण्याचा निर्णय

आंबा 'देवगड'चाच आहे का, हे तपासण्यासाठी ग्राहकांनी 91 9167 668899 या क्रमांकावर व्हॉट्सॲपच्या माध्यमातून फोटो पाठवावा. 'हापूस (अल्फोन्सो)' च्या जीआय टॅगद्वारे रजिस्टर्ड प्रोप्रायटर या नात्याने प्राप्त होणाऱ्या अधिकारांचा वापर करून संस्थेने या युनिक कोडची सक्ती करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत ३०८ शेतकरी जोडले गेल्याचे, ओंकार सप्रे यांनी सांगितले.

Agrowon, 21/03/2025

# बाजार समितीच्या नियमांमध्ये सुधारणा करणार : मंत्री रावल



**मुंबई :** कृषी उत्पन्न बाजार समितीवर असलेल्या विश्वासापोटी शेतकरी आपला शेतीमाल बाजार समितीच्या परवानाधारक व्यापाऱ्यांना विक्री करीत असतो. शेतकरी हिताच्या दृष्टीने काळानुरूप बाजार समितीच्या नियमांमध्ये किंवा धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमांमध्ये शेतकरी हिताच्या दृष्टीने शासन निश्चितच सुधारणा करेल, असे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचे कांद्याचे पैसे न दिल्याबाबत सदस्य रमेश बोरनारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या उत्तरात मंत्री रावल म्हणाले, की बाजार समितीने परवाना दिलेले व्यापारी हे शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी करतात. शेतकरी मोठ्या विश्वासाने या व्यापाऱ्यांना आपला शेतीमाल विक्री करतात. अशा व्यापारामध्ये कुठेही शेतकऱ्याचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. वैजापूर बाजार समितीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांचा मोबदला देण्यासाठी बाजार समितीने संबंधित व्यापाऱ्याची मालमत्ता व बँक हमी जप्त केली. या बँक हमी आणि मालमत्तेच्या लिलावातून ३१ लाख रुपये हे कांदा विक्री केलेल्या ११८ शेतकऱ्यांना मोबदला दिला आहे. कलम ५७ अन्वये व्यापाराच्या वैयक्तिक मालमत्तांची यादी करून या सर्व मालमत्तांची एकत्रित लिलावाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात बैठकही घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## राज्यात काजू उत्पादन वाढ, प्रक्रियेसाठी योजना राबविणार

राज्यात विशेषत: कोकणात काजू उत्पादनवाढ आणि प्रक्रियेसंदर्भात विविध योजना राबविण्यात येणार असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत सांगितले. नियम २६० अन्वये मांडेलल्या प्रस्तावाला उत्तर देताना ते बोलत होते. ते म्हणाले, की महाराष्ट्रात नव्याने काजू बोर्डाची स्थापना झाली आहे. नुकतेच बोर्डाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले असून संचालक मंडळ, अधिकारी यांची नेमणूक झाली आहे. रत्नागिरीचे काही तज्ज्ञ आणि शेतकऱ्यांसह त्यांचा अभ्यास दौरा झाला. यातून काजूचे उत्पादन वाढण्यासंदर्भात अभ्यास करण्यात आला. भारतात सर्वांत जास्त काजू विक्री होते. काजूवर प्रक्रिया करणेदेखील गरजेचे असते. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहकार्यातून मॅग्नेटच्या माध्यमातून काजू प्रक्रियेला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जाणार आहे. गाव पातळीवरील फार्मर प्रोड्यूसर संस्थांचे राज्यव्यापी संघटन तयार करून स्टेट लेव्हल असोसिएशन (एसएलए) निर्माण केल्यानंतर ते राज्य स्तरावर काम करतात. राज्यात जवळपास ४६ एसएलए आहेत. याबाबत केंद्र सरकारच्या निर्देशानुसार एक समिती तयार करण्यात आली असून पात्र ठरणाऱ्या संस्थाच एसएलए होऊ शकतील, या समितीचा अहवाल आल्यानंतर यामध्ये सुसूत्रता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन खरेदी झाली आहे. केंद्राकडे खरेदीसाठी मुदतवाढीची मागणी केली असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

Maharashtra Times, 20/03/2025

# ‘देवगड’ हापूसवर ‘यूआयडी’ कोड

## फसवणूक टाळण्यासाठी संस्थेचे पाऊल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देवगड आंबा म्हणून सर्रास विक्री करण्यात येणाऱ्या आंब्यापासून फसवणूक टाळण्यासाठी देवगड हापूस आंब्याला आता ‘टॅपर प्रूफ यूआयडी सील कोड’ (यूआयडी कोड) देण्यात येणार आहे. देवगड आंब्यावर आता ‘यूआयडी कोड’चे स्टिकर लावणे सक्तीचे असेल. त्याद्वारेच त्याची विक्री करता येईल. याबाबत देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षापासून हा निर्णय अंमलात आणण्याचे ठरविले आहे. त्यामुळे चांगला चवीचाच देवगड आता ग्राहकांना खरेदी करता येईल.

हापूस आंब्याचे भौगोलिक संकेत (जीआय) टॅगची देवगड आंबा उत्पादक सहकारी संस्था ही नोंदणीकृत संस्था आहे. उत्पादक सहकारी संस्थेचे संचालक सदस्य ॲड. ओंकार सप्रे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

‘देवगड तालुक्यातील हापूस आंबा गेल्या शतकाहून अधिक आपल्या विशिष्ट सुगंध व चवीसाठी प्रसिद्ध आहे. बाजारात त्याला मोठी मागणी आहे. देवगड हापूसच्या नावाखाली विक्री होणारे ८० टक्क्यांपेक्षा जास्त आंबे हे देवगडमधील नाहीत. गेल्या तीन दशकांपासून इतर भागांतील निकृष्ट दर्जाचे आंबे सर्रास देवगड हापूस म्हणून विकले जात आहेत. देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ‘हापूस’च्या ‘जीआय टॅग’ची नोंदणीकृत संस्था म्हणून अधिकारांचा वापर करून संस्थेने ‘टॅपर प्रूफ यूआयडी सील ‘कोड’ सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे.’

‘यूआयडी’चे पेटंट असलेल्या संस्थेने मुंबईच्या ‘सन सोल्युशन्स’ संस्थेबरोबर करार केला आहे. देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने ‘जीआय’ नोंदणीकृत शेतकऱ्यांना त्यांच्याकडील झाडांची संख्या आणि त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार ‘यूआयडी’ वितरित केले आहेत. शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा ‘यूआयडी’ लावणे बंधनकारक असेल. . आपल्याकडील आंबा देवगड येथील आहे का हे तपासण्यासाठी ग्राहकांनी +९१ ९१६७६६८८९९ या क्रमांकावर ‘व्हॉट्सॲप’च्या माध्यमातून फोटो पाठवायचा आहे, अशी माहिती सप्रे यांनी दिली.

### तोतयागिरी करणाऱ्यांवर कारवाई

तोतयागिरी करणाऱ्या आणि देवगड हापूसच्या नावाखाली बनावट आंब्यांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा या वेळी देण्यात आला आहे. ‘जीआय’ नोंदणीशिवाय आणि ‘यूआयडी’ स्टीकर असल्याशिवाय देवगड हापूसच्या नावाने विक्री करताना कोणी आढळल्यास जीआय कायदा १९९९ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ च्या तरतुदींनुसार दखलपात्र गुन्हा आहे.

# Devgad Hapus armed with unique ID to combat fakes

Anjali.Jhangiani
@timesofindia.com

**Pune**: With mango season around the corner, Alphonso mangoes, locally known as Hapus, have started coming into the market.

For years, consumers struggled to differentiate between the real, GI-certified Devgad Alphonso and inferior imitations from other regions. Now, mango lovers can finally buy with confidence—thanks to the tamper-proof UID seal (TP seal) system introduced by Devgad Taluka Mango Growers Cooperative Society Limited.

Under this system, every authentic Devgad Alphonso (Hapus) mango must carry TP seal sticker to be marketed and sold as Devgad Alphonso or Devgad Hapus. This initiative is set to eliminate counterfeit mangoes and ensure that consumers get only genuine, GI-certified fruit that Devgad is famous for.

Omkar M Sapre, a board member of the society, said, "The Devgad Alphonso mango, grown in Devgad taluka of Sindhudurg district, created a name for itself for over a century and commands a premium in the market for its unique aroma and taste. However, over 80% of mangoes being sold as Devgad Hapus today are not actually from Devgad."

Sapre added, "This robs Devgad farmers of rightful market share, creating severe social and economic issues. Devgad Taluka Mango Growers Cooperative Society Limited was compelled to take this step in exercise of the rights and powers available to the society under the provisions of Geographical Indications Act 1999 as the registered proprietor of Alphonso GI." The society, which holds (GI) tag for Devgad Alphonso mangoes, has now partnered with Mumbai-based Sun Solutions to implement the TP seal system for authentication, protecting the legacy of this regional treasure.

Pic courtesy: Devgad Taluka Mango Growers Cooperative Society Limited

## HOW TO CHECK

- **Mango buyers can now check for authenticity by looking for tamper-proof UID seal on each mango**
- Each GI-registered Devgad farmer receives TP seal UID stickers based on their tree count and production capacity
- Each sticker contains a unique alphanumeric code split into two sections— one on top of the sticker and another below the sticker



- The system reads the sticker and tells the user to write the second part of the number at the back. ***The sticker automatically splits into two parts when removed**
- If the full code matches with TP seal UID in the system, the consumer gets an automatic response, with details such as farmer's or vendor's name, village of origin, GI registration number, and so on

**Consumers can verify the authenticity of their mangoes by sending a photograph of the sticker via WhatsApp to 9167 668899**

Sakal, 19/03/2025

# देवगड हापूसवर 'युनिक आयडी कोड'

## देवगड तालुका आंबा उत्पादक संस्थेचा निर्णय

**पुणे, ता. १८ :** देवगड हापूसच्या नावाने होणारी बनावट आंब्यांची विक्री थांबवण्यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेतर्फे देवगड हापूस आंब्याला भौगोलिक संकेत (जीआय टॅगिंग) करण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅपर प्रूफ सील युआयडी' असेल. शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हे स्टिकर लावणे बंधनकारक असणार आहे.

या प्रकल्पाकरिता 'टीपी सील युआयडी'चे पेटंट असलेल्या मुंबईतील 'सन सोल्यूशन्स' या संस्थेबरोबर देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने करार केला आहे. त्या बाबतची माहिती संस्थेचे संचालक ओंकार सप्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, ''देवगड तालुक्यातील हापूस आंबा हा एक विशिष्ट सुगंध व चवीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र सध्या देवगड हापूसच्या नावाखाली विक्री होणारे सुमारे ८० टक्क्यांहून अधिक आंबे हे देवगडमधील नाहीत. यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे बनावट देवगड आंब्यांची विक्री थांबविणे, हा या मागील मुख्य हेतू आहे. जीआय नोंदणी नसलेले आणि स्टिकर नसलेले आंबे कोणीही देवगड हापूसच्या नावाने विक्री करताना आढळल्यास त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल.''



### तपासणी कशी कराल?

■ आंबा देवगडचाच आहे का, हे तपासण्यासाठी ग्राहकांनी ९१६७६६८८९९ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर आंब्याचे आणि त्यावरील स्टिकरचे छायाचित्र पाठवावे. ही सिस्टम त्या स्टीकरवरील कोड वाचते आणि स्टिकरच्या मागील क्रमांक लिहून पाठवण्यास सांगते. क्रमांक वाचण्यासाठी स्टीकर काढले असता त्याचे आपोआप दोन भाग होतात. जर व्हॉट्स ॲपद्वारे आलेला संपूर्ण कोड सिस्टीममधील 'यूआयडी'शी जुळला तर ग्राहकास शेतकरी-विक्रेत्याचे नाव, मूळ गाव, जीआय नोंदणी क्रमांक आदी तपशील पाठवला जाईल. या पडताळणी प्रक्रियेमुळे 'देवगड हापूस' बाबतची विश्वसनीयता वाढेल, असे सप्रे यांनी सांगितले.

Punyanagari, 19/03/2025

# देवगड हापूस आंब्यांवर आता युनिक आयडी कोड

## बनावट आंब्याची विक्री रोखण्यासाठी पाऊल



**पुणे :** देवगड अल्फोन्सो (हापूस) आंब्याच्या नावाने बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी 'हापूस (अल्फोन्सो)' च्या भौगोलिक संकेत (जीआय) टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅपर प्रूफ युआयडी सील' सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा खास 'टॅपर प्रूफ युआयडी सील' स्टिकर लावणे बंधनकारक असेल आणि असे यूआयडी असलेले आंबेच 'देवगड हापूस' किंवा 'देवगड अल्फोन्सो' म्हणून विक्री किंवा विपणन करता येणार आहे. या उपक्रमामुळे देवगड हापूसच्या नावाखाली सर्रास होणारी बनावट आंब्यांची विक्री पूर्णतः बंद होतील आणि ग्राहकांना केवळ जीआय प्रमाणित, अस्सल देवगड हापूस आंबेच मिळतील, असा संस्थेचा विश्वास आहे.

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था मर्यादितचे संचालक सदस्य ॲड. ओंकार एम. सप्रे, शेतकरी सभासद नचिकेत भिडे आणि सन सोल्युशनचे प्रशांत यादव उपस्थित होते. यावेळी सप्रे म्हणाले, देवगड तालुक्यातील हापूस आंबा विशिष्ट सुगंध व चवीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, सध्या देवगड हापूसच्या नावाखाली विक्री होणारे ८० टक्के पेक्षा जास्त आंबे देवगडमधील नाहीत. त्यामुळे देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, त्यामुळेच 'हापूस (अल्फोन्सो)' च्या जीआय टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर या नात्याने प्राप्त होणाऱ्या अधिकारांचा वापर करून संस्थेने टॅपर प्रूफ यूआयडी सील सक्तीचे करण्याचा हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाकरिता 'टॅपर प्रूफ युआयडी सील' चे पेटंट असलेल्या संस्थेने मुंबई स्थित सन सोल्यूशन्स संस्थेबरोबर करार केला आहे. तरी व्यापारी, दलाल आणि किरकोळ विक्रेते यांनी तोतयागिरी आणि बनावट विक्री करण्यांपासून दूर राहावे, असे आवाहन संस्थेने केले आहे. जीआय नोंदणी नसलेले आणि 'टॅपर प्रूफ युआयडी सील स्टिकर नसलेले कोणीही 'देवगड हापूस' च्या नावाने विक्री करताना आढळल्यास त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही संस्थेने दिला आहे.

पुढारी
www.pudhari.com

# आता अस्सल देवगड आंब्यालाही 'यूआयडी'



**१ देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेचा पुढाकार**

**२ खरा देवगड आंबा शोधणे होणार सोपे**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देवगड हापूस आंब्याच्या नावाने बाजारात बनावट आंब्यांची होणारी विक्री रोखण्यासाठी अस्सल देवगड आंब्यांवर युनिक आयडी कोड लावण्यात येणार असून, प्रत्येक आंब्यावर हा कोड असणार आहे. त्यामुळे ग्राहकांना बनावट आणि खरा देवगड हापूस आंबा ओळखणे सोपे होणार आहे, अशी माहिती देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेचे संचालक अ‍ॅड. ओंकार सप्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शेतकरी सभासद नचिकेत भिडे, सन सोल्युशन्सचे प्रशांत यादव या वेळी उपस्थित होते.

देवगड अल्फोन्सोच्या (हापूस) नावाने बाजारात बनावट व निकृष्ट दर्जाच्या आंब्यांची विक्री करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. हे रोखण्यासाठी हापूसच्या भौगोलिक संकेत (जीआय) टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर असलेल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने पुढाकार घेतला आहे. या वर्षीपासून



प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर टँपर प्रूफ यूआयडी सील सक्तीचे करण्याचा निर्णय संस्थेने घेतला असून, आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा टँपर प्रूफ यूआयडी सील स्टिकर लावणे बंधनकारक असणार आहे. यूआयडी असलेले आंबेच देवगड हापूस किंवा देवगड अल्फोन्सो म्हणून विक्री करता येणार आहेत. या उपक्रमामुळे देवगड हापूस आंब्यांच्या नावाखाली होणारी बनावट आंब्यांची विक्री बंद होईल. ग्राहकांना केवळ जीआय प्रमाणित अस्सल देवगड हापूस आंबेच मिळतील, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे.

देवगड तालुक्यातील हापूस आंबा गेल्या शतकाहून अधिक काळ आपल्या विशिष्ट सुगंध व चवीसाठी प्रसिद्ध आहे. त्याला बाजारात मोठी मागणी आहे. मात्र, सध्या देवगड हापूसच्या नावाखाली विक्री होणारे ८० टक्क्यांहून अधिक आंबे हे वास्तविक देवगडमधील नाहीत. त्यामुळेच हापूसच्या (अल्फोन्सो) जीआय टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर या नात्याने प्राप्त होणाऱ्या अधिकारांचा वापर करून संस्थेने टँपर प्रूफ यूआयडी सील सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी टँपर प्रूफ यूआयडी सीलचे पेटंट असलेल्या मुंबई येथील सन सोल्युशन्स संस्थेबरोबर करार केला असल्याचे अ‍ॅड. सप्रे यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांना यूआयडी स्टिकर वितरित

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने जीआय नोंदणीकृत शेतकऱ्यांना त्यांच्याकडील आंब्यांच्या झाडांची संख्या व त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार टँपर प्रूफ यूआयडी सील वितरित केले आहेत. शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा यूआयडी स्टिकर लावणे बंधनकारक असणार आहे.

# देवगड हापूससाठी ओळखीची खूण

## खरा माल ओळखण्यासाठी आधुनिक प्रणालीचा वापर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देवगड हापूस आंब्याच्या नावाने बाजारात मोठ्या प्रमाणात बनावट आंब्यांची विक्री केली जाते. ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी आता प्रत्येक देवगड हापूस आंब्याला 'टँपर-प्रूफ यूआयडी सील' (टी. पी. सील यूआयडी) सक्तीचे करण्याचा निर्णय देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने घेतला आहे.

संस्थेचे संचालक सदस्य अॅड. ओंकार सप्रे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले, 'आंब्यावर लावलेल्या टी. पी. सील यूआयडी कोडवरून खरा देवगड हापूस ओळखता येणार आहे. भौगोलिक मानांकन (जीआय) नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांनाही या तंत्रज्ञानाचा फायदा होईल.'

'देवगड तालुक्यातील आंबा उत्पादक सहकारी संस्थेतर्फे जीआय नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांना झाडांची संख्या आणि उत्पादन क्षमतेनुसार टी. पी. सील यूआयडी स्टिकर्सचे वितरण करण्यात आले आहे. या प्रणालीत शेतकऱ्यांनी बाजारात पाठविलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा यूआयडी स्टिकर लावणे बंधनकारक असेल,' असेही सप्रे यांनी स्पष्ट केले.



### कसा ओळखायचा देवगड हापूस?

- खरेदी करत असलेला आंबा देवगड हापूसच आहे का, हे तपासण्यासाठी ग्राहकांना ९१६७६६८८९९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर आंब्यावर असलेल्या स्टिकरचा फोटो पाठवावा लागेल.
- प्रत्येक स्टिकर दोन भागांत विभागलेले असून, यूआयडी कोडचा एक भाग स्टिकरच्या वर आणि दुसरा भाग स्टिकरच्या खाली दिसेल.
- स्टिकरवर असलेला कोड स्वयंचलित प्रणालीच्या माध्यमातून वाचला जातो.
- ही प्रणाली ग्राहकाला स्टिकरच्या मागे असलेल्या क्रमांकाची मागणी करते. त्यानंतर जर ग्राहकाने दिलेला क्रमांक प्रणालीत असलेल्या यूआयडी कोडशी जुळला, तर स्टिकर असलेला आंबाच खरा देवगड हापूस असल्याचे प्रमाणित होईल.
- ग्राहकाला शेतकरी, विक्रेत्याचे नाव, मूळ गाव, जीआय नोंदणी क्रमांक असा तपशीलही देण्यात येईल.

Loksatta, 19/03/2025

पुण्य नगरी

# हापूस भाव खाणार; उत्पादन ५० टक्क्यांनी घटले

## ग्राहकांच्या खिशाला लागणार कात्री

## ३० टक्क्यांनी हंगामाच्या सुरुवातीला दर जास्त

**गणेश वाघमोडे**

**पुणे** : अवकाळी पाऊस, तापमानातील चढ-उतार आणि यंदा वाढलेली प्रचंड उष्णता यामुळे आंब्याचा मोहोर गळण्याचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, यंदाच्या हंगामात आंबा कमी प्रमाणात बाजारात उपलब्ध होणार आहे. दर वर्षीच्या तुलनेत यंदा जवळपास ५० ते ६० टक्क्यांनी उत्पादनात घट झाली आहे.

फेब्रुवारी महिन्यातील सरासरी वाढलेल्या उष्णतेमुळे मोहोर गळून पडला आहे. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. सध्या वाढलेल्या उष्णतेमुळे आंबा टिकवणे अवघड होत आहे. तसेच तळकोकणातून म्हणजेच देवगड, मालवण, सावंतवाडी, मालवण तालुक्यासह वेंगुर्ला परिसरातील पहिल्या टप्प्यातील माल अतिशय कमी आहे. दुसऱ्या टप्प्यातील असणारा जानेवारीतील मोहोर हा उष्णतेमुळे तोदेखील टिकला नाही. त्यामुळे मे महिन्यात होणारे



आंब्याचे उत्पादन तेदेखील ४० ते ५० टक्क्यांवरच स्थिरावेल असा अंदाज आहे.

राजापूर, रत्नागिरी, जयगड व गुहागर या तालुक्यांमध्ये उत्पादन कमी आहे. तसेच रायगडमधील श्रीवर्धन, बाणकोट या पट्ट्यातदेखील उत्पादन कमी आहे. त्यामुळे एकंदरीतच सरासरीच्या तुलनेत कोकणातून येणारा माल हा दरवर्षीच्या तुलनेत कमी आहे.

परिणामी, यंदा रत्नागिरी हापूसचे दर हे तेजीतच राहतील असा अंदाज आहे.

हापूस आंब्याचे उत्पादन कमी असल्यामुळे प्रक्रिया उद्योगांचे खरेदीचे दर हे साधारणपणे १५ ते २० टक्क्यांनी जास्त राहतील. त्यामुळे त्यांची साठवणूक क्षमता पूर्ण होणार नाही. परिणामी, त्याचा फायदा हा कर्नाटक हापूसच्या शेतकऱ्यांना होईल. प्रक्रिया उद्योगचालक हे आंबा हंगामाची आतुरतेने वाट पाहत आहेत. वर्षभर हापूसचे उपपदार्थ तसेच मिठाईवाले व ज्यूसवाले यांना आंब्याची अत्यंत गरज राहील.

यंदा कोकणातील शेतकरी चिंतेत आहेत. पुणे, सांगली, कोल्हापूर या भागात असणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा कोकणातील कमी मालाचा चांगला फायदा होईल. मावळ, भोर, वेल्हा, पाटण, मलकापूर येथे हापूस आंब्याचे चांगले उत्पादन होते. त्यांना चांगले दर मिळतील. यंदा हापूस कमी असल्यामुळे केसरलादेखील चांगली मागणी राहील, असा व्यावसायिकांचा अंदाज आहे.

> आंब्याचे उत्पादन कमी आहे की जास्त, याचा प्रक्रिया उद्योगाला फरक पडत नाही. पाऊस किती उशिरा पडतोय, यावर प्रक्रिया उद्योगांचे गणित अवलंबून असते. एप्रिल अखेरमध्ये पाच ते सहा राज्यांतून विविध प्रकारच्या आंब्यांची आवक सुरू होते. रिकामी पेटी, वाहतूक, भराई आणि इतर खर्च मोठा असतो. त्यामुळे उत्पादकांना परवडत नाही. त्यामुळे ते प्रक्रिया उद्योगांना जागेवरच विक्री करतात, असे प्रक्रिया उद्योजक माऊली आंबेकर यांनी सांगितले.

यंदा आंब्याचा हंगाम खूपच कमी आहे. ३० मार्च रोजी गुढीपाडवा असल्याने त्या पार्श्वभूमीवर २० मार्चपासून आंब्याची आवक वाढेल. मात्र, दर स्वस्त राहणार नाहीत. याचे प्रमुख कारण म्हणजे अवेळी पडलेला पाऊस, थंडी तसेच उष्णता आहे. यंदा १५ मेपर्यंत हंगाम सुरू राहील.

**- अनिरुद्ध ऊर्फ बापू भोसले**
संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

---

यंदा वाढलेल्या प्रचंड उष्णतेचा परिणाम हा रत्नागिरी हापूसवर मोठ्या प्रमाणात झाला आहे. मोहोर गळतीचे प्रमाण हे दरवर्षीच्या सरासरीच्या तुलनेत यंदा केवळ ३० ते ४० टक्के इतकेच हापूसचे उत्पादन आहे. त्यामुळे हापूसचे दर हे चढेच राहतील असा अंदाज आहे.

**- नितीन कुंजीर,** हापूस आंब्याचे व्यापारी

---

गुलटेकडी येथील मार्केटयार्डात सध्या ८०० ते १ हजार पेट्यांची हापूस आंब्याची आवक होत आहे. सध्या एक डझनाच्या चांगल्या दर्जाच्या हापूस आंब्यास दीड ते दोन हजार रुपये दर मिळत आहे. पुढील आठवड्यात आंब्याची आणखी आवक वाढेल.

**- संजय वखारे,** रत्नागिरी हापूसचे व्यापारी

---

यंदा आंब्याच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे दर वर्षीच्या तुलनेत दर जास्त राहतील. हवामानातील बदलामुळे उत्पादन कमी आहे. त्यामुळे यंदा आंब्याचा हंगामदेखील लवकरच संपेल असा अंदाज आहे. दरम्यान, मे महिन्यात सामान्यांच्या आवाक्यात दर येतील.

**- किशोर लडकत,** रत्नागिरी हापूसचे व्यापारी

---

यंदा हापूस आंब्याची परिस्थिती ही गंभीर आहे. अवघे २० ते २५ टक्के इतकेच उत्पादन हाती लागत आहे. उष्णतेमुळे १० टक्के आंबे हे भाजलेले आहेत. त्याचा उपयोग हा शून्य होतो. सध्या तापमान हे ४० ते ४१ अंश सेल्सिअस इतके आहे. त्यामुळे आंबा हा भाजला जात आहे. दर वर्षीच्या तुलनेत २५ ते ३० टक्क्यांनी आंबा उत्पादकांचे खर्च वाढले आहेत.त्यातुलनेत आंब्याचे दर वाढत नाहीत. एकूणच, उत्पादकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आंबा तयार होण्यासाठी आठ दिवस लागत असतील तर तो उष्णतेमुळे चारच दिवसांत तयार होत आहे.

**- राजेश पावसकर**
आंबा उत्पादक, राजापूर, जि. रत्नागिरी

---

फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील आंब्याचा हंगाम हा यंदा तुलनेने कमी आहे. एप्रिल आणि मे महिन्यात रत्नागिरी हापूसची आवक वाढेल. त्या वेळी आंब्याचे दर कमी होतील. मात्र, यंदा दर वर्षीच्या तुलनेत आंब्याचे दर हे २५ ते ३० टक्क्यांनी जास्त आहेत.

**- युवराज काची,**
रत्नागिरी हापूसचे व्यापारी

Loksatta, 18/03/2025

# यंदा ४ हजार मेट्रिक टन आंब्याची परदेशवारी

पूनम सकपाळ, लोकसत्ता

**वाशी कृषी पणन मंडळाची सुविधा केंद्रे सज्ज झाली असून एप्रिलपासून आंब्याच्या निर्यातीला सुरुवात होणार आहे . परदेशातही आंब्याला पसंती दिली जात आहे .**



**नवी मुंबई :** वाशीतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या प्रमुख निर्यात सुविधा केंद्रांवरून परदेशात आंबा निर्यातीस एप्रिल महिन्यापासून सुरुवात होणार आहे. त्या अनुषंगाने आंबा निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांसाठी लागणाऱ्या सर्व सोयी-सुविधा सुसज्ज आहेत. यंदा चार हजार मेट्रिक टन आंबा निर्यात करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याची माहिती मंडळाने दिली.

दरवर्षी आंब्याचा खरा हंगाम मार्च महिन्यात सुरू होतो तर फेब्रुवारीपासून हापूस दाखल होण्यास सुरुवात होते. देशांतर्गत आंब्याची मागणी असतेच, मात्र परदेशातही आंब्याला पसंती दिली जात आहे. आखाती देश, युरोपीय देश, ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया या ठिकाणी निर्यात होते. देशातून होणाऱ्या एकूण आंबा निर्यातीत दरवर्षी ८० ते ८५ टक्के वाटा महाराष्ट्राचा असतो. महाराष्ट्र शासनाच्या कृषी पणन मंडळ सुविधा केंद्रातून हापूस निर्यात होते. मंडळाच्या विभागातून राज्यातील आंबा निर्यात वाढत आहे. जपान, दक्षिण कोरिया आणि युरोपीय देशांत हापूसबरोबर केसर, तोतापुरी, सुवर्णरेखा, बेगनपल्ली यांची निर्यात होत असते.

## आंब्याच्या डोज मॅपिंगनंतर हिरवा कंदील

कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावर अमेरिकन निरीक्षक १ एप्रिलपासून उपलब्ध असणार आहे. त्यांच्या उपस्थितीत आंब्याचे डोज मॅपिंग करण्यात येणार असून प्रत्यक्ष आंबा निर्यात ३ एप्रिलपासून सुरुवात होईल. चालू वर्षी निर्यातदारांच्या अपेक्षा पाहता कृषी पणन मंडळाच्या वी किरण, वीपीएफ व बीएचटी या तीन सुविधा केंद्रांवरून सुमारे ४ हजार मेट्रिक टन आंबा निर्यातीचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र व्यतिरिक्त केरळ, कर्नाटक व गुजरात या राज्यातील निर्यातदारही वी किरण सुविधा केंद्रास भेट देत असून नवीन निर्यातदार या सुविधा केंद्राला जोडले जाणार आहेत.

## आंबा निर्यातीचे उद्दिष्ट (मेट्रिक टन)

- युरोपीय देश - १७१०
- अमेरिका - १३००
- न्यूझीलंड - २००
- ऑस्ट्रेलिया - ७५
- जपान - ७०
- दक्षिण कोरिया - १०
- एकूण - ३३६५

Sakal, 13/03/2025


# काजूच्या उत्पादनवाढीसाठी विविध योजना



राज्यात विशेषतः कोकणात काजू उत्पादन वाढ आणि प्रक्रियेसंदर्भात विविध योजना राबविण्यात येणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. विधानपरिषदेत नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला उत्तर देताना ते बोलत होते. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, पंकज भुजबळ या सदस्यांनी त्यांची भूमिका मांडली. रावल म्हणाले, ''महाराष्ट्रामध्ये नव्याने काजू मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. कामकाजही सुरू झाले असून मंडळावर संचालक मंडळ, अधिकारी यांची नेमणूक झाली आहे. रत्नागिरीचे काही तज्ज्ञ आणि शेतकऱ्यांसह त्यांचा अभ्यास दौरा झाला आहे. या दौऱ्यातून काजूचे उत्पादन वाढण्यासंदर्भात अभ्यास करण्यात आला आहे.''

Sakal, 13/03/2025

# 'कृषी उत्पन्न'च्या नियमांमध्ये सुधारणा करणार'



जयकुमार रावल

''कृषी उत्पन्न बाजार समितीवरील विश्वासामुळे शेतकरी त्यांचा शेतमाल बाजार समितीच्या परवानाधारक व्यापाऱ्यांना विक्री करीत असतो. शेतकरी हिताच्या दृष्टीने काळानुरूप बाजार समितीच्या नियमांमध्ये किंवा धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमांमध्ये शेतकरी हिताच्या दृष्टीने सरकार निश्चितच सुधारणा करेल,'' असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचे कांद्याचे पैसे न दिल्याबाबत सदस्य रमेश बोरनारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्याला उत्तर देताना रावल म्हणाले, की कृषी उत्पन्न बाजार समितीने परवाना दिलेले व्यापारी हे शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करतात. शेतकरी मोठ्या विश्वासाने या व्यापाऱ्यांना आपला शेती माल विक्री करतात. अशा व्यापारामध्ये कुठेही शेतकऱ्याचे नुकसान होऊ दिले जाणार नाही.

# चार बाजार समित्यांना मिळणार राष्ट्रीय दर्जा

## मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरबाबत विचार ; सुधारणा विधेयकासाठी हालचाली

प्रवीण डोके

पुणे : पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर येथील चार कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. कारण, समित्यांमध्ये सुधारणा २०१८ विधेयक क्र. ६४ अधिवेशनात पास करण्याच्या हालचाली वेगाने सुरू आहेत. याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमली आहे. समितीची पहिली बैठकही तातडीने झाली, अशी माहिती विश्‍वसनीय सूत्रांनी दिली आहे.

प्रस्तावित केलेल्या बाजार समितीच्या रचनेसंदर्भातील सुधारणेच्या अनुषंगाने राज्यातील शेतकरी, व्यापारी आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून मागील वर्षी सूचना आणि हरकती मागविल्या होत्या. त्यात राज्यातून सुमारे १० हजारांपेक्षा जास्त हरकती आल्या होत्या. राज्य सरकारने पुन्हा नवीन उपसमिती नेमल्याने समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल, अशी माहिती मिळत आहे.



केंद्र सरकारच्या नवीन मॉडेलनुसार राज्य सरकारने विविध पणन सुधारणा केल्या आहेत. यातील सर्वांत महत्त्वपूर्ण सुधारणांमध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील मोठ्या बाजार समित्या ताब्यात घेण्याची राजकीय खेळी सरकारने २०१८मध्येच केली होती. त्याला आता यश येण्याची शक्यता असून, समित्यांवर सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील शासन नियुक्त प्रशासकीय मंडळाच्या नियुक्तीची शक्यता आहे. समित्यांवर आता शासन नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाच्या नियुक्तीची शिफारस जुन्या विधेयकात होती. पणनमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेली उपसमिती कोणत्या सुधारणा सुचविते? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### संचालक मंडळे होणार बरखास्त

सुधारणा २०१८ विधेयकामुळे एकूण आवकेच्या ३० टक्के शेतमाल किंवा तीनपेक्षा अधिक राज्यांतून येत असलेल्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. समित्यांवरील विद्यमान संचालक मंडळे बरखास्त होऊन प्रशासकीय मंडळ नियुक्त करणे, विशेष शेतमालाची घोषणा करणे यासह अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. विधेयक क्र.६४ मुळे राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेत पुणे बाजार समितीचा कारभार येणार आहे.

### विशेष वस्तू बाजाराची स्थापना

बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा प्राप्त झाल्यानंतर विशेष वस्तूंचा बाजारदेखील घोषित करता येणार आहे. यामध्ये फळे, भाजीपाला, फुले, कांदा, सफरचंद, संत्री, मनुका, हळद, काजू, कापूस, औषधी आणि सुगंधी वनस्पती, पशुधन (गुरे, शेळी, मेंढी, गाढव, घोडा, मासळी, कुक्कुट आदी) आणि इतर कोणतेही पाच बाजार स्थापन करता येणार आहेत.

“ प्रस्तावित केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने आधीच हरकती मागविलेल्या आहेत. तसेच, नवीन हरकती मागविण्यासंदर्भात कोणत्याही सूचना नाहीत. बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यासंदर्भात राज्य सरकार विचाराधीन आहे.

- विकास रसाळ, पणन संचालक

### ...असे असेल प्रशासकीय मंडळ

- सभापती पणनमंत्री अथवा राज्य सरकारला योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती.
- सचिवपदी सहनिबंधक दजपिक्षा कमी दर्जाचा नसलेला प्रतिनिधी.
- उपसभापती-अपर निबंधक (सहकार) पदापेक्षा कमी दर्जाची नसेल असे अधिकारी.
- महसूल विभागातील एक याप्रमाणे सहा शेतकरी प्रतिनिधी व आदी.

### प्रस्तावित सुधारणांची मुख्य वैशिष्ट्ये

- पशुधनासंबंधातील पणनाचे विनियमन करण्याकरिता तरतुदी.
- राष्ट्रीय नामांकित बाजारतळ व त्याच्याशी संबंधित आणि आनुषंगिक बाबींकरता तरतुदी.
- विविध प्रकारचे बाजार स्थापन करण्याबाबत तरतुदी.
- बाजार उपतळ म्हणून वखार, शीतगृह इत्यादींकरिता तरतुदी.
- ई-नाम, ई-व्यापारासाठीच्या तरतुदी.

**Samana, 11/03/2025**

# राष्ट्रीय बाजार समित्यांसाठी शासनाच्या वेगाने हालचाली

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) - राज्य सरकारकडून बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे. मंत्रिमंडळात गुरूवारी नव्याने यासाठी समितीची स्थापणा करत नुकतीच बैठक घेतली. अधिवेशनानंतर अध्यादेश काढत राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या मोठ्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत. नविन सुधारणांनुसार या बाजार समित्यांवर अस्तित्वात असलेले संचालक तत्काळ मंडळ बरखास्त होणार आहेत. दीड वर्षापुर्वी पुणे बाजार समितीवर आलेले संचालक मंडळ बरखास्त होण्याची शक्यता आहे.

शेतमाल पणन सुधारणांमधील सर्वात महत्त्वाच्या असणाऱ्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देणारी सुधारणा राज्यपालांच्या सहीने २०१८ मध्ये मंजूर करण्यात आली होती. मात्र यानंतरच्या काळात या विधेयकाला विरोध होत सुधारणांची प्रक्रिया थांबविली होती. आता पुन्हा या प्रक्रियेला सुरूवात झाली. विधानसभा निवणुकांनंतर नविन मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानंतर यासाठी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालेय शिक्षमंत्री दादा भुसे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह कृषी आणि पणन सचिवांची नियुक्ती केली आहे. गुरूवारी समितीबाबत शासन निर्णय निघताच शुक्रवारी याबाबत बैठक घेत आढाव घेण्यात आला.

> “ सरकारने प्रस्तावित केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने आधीच हरकती मागविण्यात आल्या होत्या. नवीन हरकती मागविण्याची आवश्यकता नाही.
>
> - विकास रसाळ,
> पणन संचालक, महाराष्ट्र राज्य.

या समित्यांवर आता शासन नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची शिफारस जुन्या विधेयकात होती. यामुळे आता पणनमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखालील समिती कोणत्या सुधारणा सुचविते याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

**भाजपकडे सत्ताकेंद्र जाणार !**

मोठ्या बाजार समित्या स्वतःच्या ताब्यात घेण्याची राजकीय खेळी भाजप सरकारने २०१८ मध्येच केली होती. या खेळीला आता यश येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## संचालक मंडळ होणार तातडीने बरखास्त

■ राज्य शासनाने राष्ट्रीय नामांकित बाजार तळाची अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर लगेच विद्यमान बाजार समिती कार्य करणे बंद करील आणि सर्व विद्यमान समिती सदस्य हे आपले पद धारण करणे बंद करतील असे २०१८ च्या अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सुधारणांनंतर पुणे बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त होण्याची चिन्हे आहेत.

सकाळ 11/03/2025 पुणे, मंगळवार,

# चार बाजार समित्यांना मिळणार राष्ट्रीय दर्जा

## मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरबाबत विचार; सुधारणा विधेयकासाठी हालचाली

■ प्रवीण डोके

**मार्केट यार्ड, ता. १० : पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर येथील चार कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. कारण, समित्यांमध्ये सुधारणा २०१८ विधेयक क्र. ६४ अधिवेशनात पास करण्याच्या हालचाली वेगाने सुरू आहेत. याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमली आहे. समितीची पहिली बैठकही तातडीने झाली, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.**

प्रस्तावित केलेल्या बाजार समितीच्या रचनेसंदर्भातील सुधारणेच्या अनुषंगाने राज्यातील शेतकरी, व्यापारी आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून मागील वर्षी सूचना आणि हरकती मागविल्या होत्या. त्यात राज्यातून सुमारे १० हजारांपेक्षा जास्त हरकती आल्या होत्या. राज्य सरकारने पुन्हा नवीन उपसमिती नेमल्याने समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल, अशी माहिती मिळत आहे.

केंद्र सरकारच्या नवीन मॉडेलनुसार राज्य सरकारने विविध पणन सुधारणा

सुधारणांमध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील मोठ्या बाजार समित्या ताब्यात घेण्याची राजकीय खेळी सरकारने २०१८मध्येच केली होती. त्याला आता यश येण्याची शक्यता असून, समित्यांवर सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील शासन नियुक्त प्रशासकीय मंडळाच्या नियुक्तीची शक्यता आहे. समित्यांवर आता शासन नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाच्या नियुक्तीची शिफारस जुन्या विधेयकात होती. पणनमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेली उपसमिती कोणत्या सुधारणा सुचविते? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



### संचालक मंडळे होणार बरखास्त

■ सुधारणा २०१८ विधेयकामुळे एकूण आवकेच्या ३० टक्के शेतमाल किंवा तीनपेक्षा अधिक राज्यांतून येत असलेल्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. समित्यांवरील विद्यमान संचालक मंडळे बरखास्त होऊन प्रशासकीय मंडळ नियुक्त करणे, विशेष शेतमालाची घोषणा करणे यासह अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. विधेयक क्र.६४ मुळे राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेत पुणे बाजार समितीचा कारभार येणार आहे.

### विशेष वस्तू बाजाराची स्थापना

■ बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा प्राप्त झाल्यानंतर विशेष वस्तूंचा बाजारदेखील घोषित करता येणार आहे. यामध्ये फळे, भाजीपाला, फुले, कांदा, सफरचंद, संत्री, मनुका, हळद, काजू, कापूस, औषधी आणि सुगंधी वनस्पती, पशुधन (गुरे, शेळी, मेंढी, गाढव, घोडा, मासळी, कुक्कुट आदी) आणि इतर कोणतेही पाच बाजार स्थापन करता येणार आहेत.

### असे असेल प्रशासकीय मंडळ

१ सभापती पणनमंत्री अथवा राज्य सरकारला योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती

२ सचिवपदी सहनिबंधक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला प्रतिनिधी

३ उपसभापती-अपर निबंधक (सहकार) पदापेक्षा कमी दर्जाची नसेल असे अधिकारी

४ महसूल विभागातील एक याप्रमाणे सहा शेतकरी प्रतिनिधी व आदी

### प्रस्तावित सुधारणांची मुख्य वैशिष्ट्ये

१ पशुधनासंबंधातील पणनाचे विनियमन करण्याकरिता तरतुदी

२ राष्ट्रीय नामांकित बाजारतळ व त्याच्याशी संबंधित आणि आनुषंगिक बाबींकरता तरतुदी

३ विविध प्रकारचे बाजार स्थापन करण्याबाबत तरतुदी

४ बाजार उपतळ म्हणून वखार, शीतगृह इत्यादींकरिता तरतुदी

५ ई-नाम, ई-व्यापारासाठीच्या तरतुदी

"प्रस्तावित केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने आधीच हरकती मागविलेल्या आहेत. तसेच, नवीन हरकती मागविण्यासंदर्भात कोणत्याही सूचना नाहीत. बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यासंदर्भात राज्य सरकार विचाराधीन आहे.

- विकास रसाल, पणन संचालक

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# राज्यात नव्याने होऊ शकतात ६९ बाजार समित्या

## 'एक तालुका, एक बाजार समिती' घोषणेमुळे शेतमाल विक्रीस चालना मिळणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात ज्या तालुक्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्यानुसार 'एक तालुका, एक बाजार समिती' योजना राबविण्याच्या निर्णयामुळे राज्यात ६९ बाजार समित्या नव्याने अस्तित्वात येऊ शकतात, अशी माहिती पणन विभागाच्या सूत्रांकडून मिळाली.

संबंधित तालुक्यात बाजार समिती निर्माण होण्यामुळे शेतमाल विक्री चालना मिळण्यास मदत होईल. त्याबरोबर आनुषंगिक जीवनावश्यक वस्तू विक्रीसही पाठबळ मिळून रोजगाराच्या संधी वाढण्याच्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.

राज्यात ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत आहेत व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. तसेच, राज्यातील ३६ जिल्ह्यांत ३५८ तालुके आहेत. त्यापैकी २८९ तालुक्यांमध्ये बाजार समित्या कार्यरत असून, उर्वरित ६९ तालुक्यांमध्ये बाजार समित्या कार्यरत नाहीत, अशा ठिकाणी या समित्या अर्थसंकल्पीय घोषणेमुळे निर्माण होऊ शकतात, अशी माहिती पणनच्या सूत्रांकडून समजली.

बाजार समित्या नसलेल्या ६९ तालुक्यांची नांवे पुढीलप्रमाणे.: भडगाव, एरंडोल, मुक्ताईनगर, पेठ, त्र्यंबकेश्वर, कुर्ला, बोरिवली, अंधेरी, अंबरनाथ, वाडा, मोखाडा, जव्हार, विक्रमगड, तलासरी, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, सुधागड, उरण, राजापूर, लांजा, संगमेश्वर, गुहागर, चिपळूण, दापोली, खेड, मंडणगड, दोडामार्ग, सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण, कणकवली, वैभववाडी, देवगड, राजगड, हवेली, सोलापूर (दक्षिण), चंदगड, आजरा, भुदरगड, कागल, राधानगरी, गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, जत, कवठेमहांकाळ, कडेगाव, महाबळेश्वर, सोयगाव, खुलताबाद, शिरूर कासार, अर्धापूर, भातकुली, चिखलदरा, साकोली, मोहाडी, सालेकसा, जिवती, बल्लारपूर, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा, धानोरा, कोरची, कुरखेडा, देसाईगंज (वडसा), नागपूर ग्रामीण.




Pune Edition
Mar 11, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com





# यंदा चार हजार टन आंबा जाणार सातासमुद्रापार!

कृषी पणन मंडळाची सुविधा केंद्रे सज्ज

पुढारी वॉच

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशीतील प्रमुख निर्यात सुविधा केंद्रांवरून परदेशात आंबा निर्यातीस एप्रिल महिन्यापासून सुरुवात होईल. त्या दृष्टीने आंबा आयातदार देशांना आवश्यक असलेल्या प्रक्रिया करून देण्याच्या सर्व सोयी-सुविधा परिपूर्ण करण्यात आल्या आहेत. गतवर्षी पणनच्या सुविधांच्या वापरातून सुमारे तीन हजार टन आंबा निर्यात करण्यात आला होता. चालूवर्षी म्हणजे हंगाम २०२५ मध्ये सुमारे चार हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट मंडळाने निश्चित केल्याचे सांगण्यात आले.**

आंबा निर्यातीसाठी आयातदार देशांच्या निकषान्वये आवश्यक पॅकहाऊस, उष्णजल प्रक्रिया (हॉट वॉटर ट्रीटमेंट), उष्ण बाष्प प्रक्रिया (व्हेपर हीट ट्रीटमेंट), विकिरण प्रक्रिया (इरॅडिएशन प्रक्रिया) ह्या सुविधांची उभारणी मंडळाने वाशीत व राज्यांत इतरत्र केलेली आहे. राज्याचे पणनमंत्री आणि पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल मंत्री यांनी गेल्या महिन्यातच वाशीतील आंबा निर्यातीच्या सुविधेस भेट दिली होती. त्याचा वापर वाढविण्यासंदर्भात त्यांनी सूचना दिल्या असून त्या अनुषंगाने सुविधे-वरील कामकाज आता सुसज्ज झाल्याची माहिती पणन मंडळातून देण्यात आली.



देशातून होणाऱ्या एकूण आंबा निर्यातीत दरवर्षी ८० ते ८५ टक्के वाटा महाराष्ट्राचा राहतो. केंद्राच्या अपेडा संस्थेने विकसित केलेल्या 'मँगोनेट' या ऑनलाईन प्रणालीवर निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी प्रथम करावी लागते. ही नोंदणी निर्यातीसाठी बंधनकारक आहे. त्या अंतर्गत देशात १८ हजार ५३९ आंबा बागांची नोंदणी झाली असून त्यापैकी महाराष्ट्रातील संख्या १३ हजार ४१ इतकी आहे.



**वाशीतील पणन मंडळाच्या सुविधा केंद्रावर आंबा निर्यातीपूर्वी तपासणी व विविध प्रक्रिया केल्या जातात. त्यानंतरच आंबा निर्यात केली जाते.**





## प्रक्रियेत नेमके काय करतात?

- **उष्णजल प्रक्रिया (हॉट वॉटर ट्रीटमेंट) :** या प्रक्रियेत ४६ अंश सेल्सियस तापमानात ६० मिनिटे आंबा गरम पाण्यात ठेवला जातो. त्यामुळे आंब्यामध्ये फळमाशी असल्यास नष्ट होते.
- **उष्ण बाष्प प्रक्रिया (व्हेपर हीट ट्रीटमेंट) :** यामध्ये ४७ अंश सेल्सियस तापमानात २० मिनिटे आंब्यावर वाफेचा मारा केला जातो. यामुळे आंब्यामधील फळमाशीचे निर्मूलन होते.
- **विकिरण प्रक्रिया (इरॅडिएशन प्रक्रिया) :** आंब्यावर गामा किरणांचा मारा केला जातो. त्यामुळे या प्रक्रियेने आंब्यामधील कोयकिडा व इतर कीड नष्ट होते.

## आंबा निर्यातीचे उद्दिष्ट (मेट्रिक टन)

**(विकिरण सुविधा, उष्ण बाष्प प्रक्रिया व भाजीपाला प्रक्रिया केंद्रातून होणारी संभाव्य निर्यात)**

| | | |
|---|---|---|
| युरोपियन देश | - | १७१० |
| अमेरिका | - | १३०० |
| ऑस्ट्रेलिया | - | ७५ |
| जपान | - | ७० |
| दक्षिण कोरिया | - | १० |
| न्यूझिलंड व अन्य देश | - | २०० |

**(सामाईक पॅकहाऊसमधून होणारी संभाव्य निर्यात)**

- कॅनडा, सिंगापूर, हाँगकाँग आणि आखाती देश - २००
- बारामती सुविधेतून अपेक्षित निर्यात - २५०
- अर्जेंटिना देशात आंबा निर्यात सुरू करणार आहे
- अमेरिकेस आंबा निर्यात यंदा वाढविण्यावर भर आहे
- **एकूण आंबा निर्यात - ३ हजार ८१५ मेट्रिक टन**

"जगातील बहुतांशी विकसित देशांमध्ये आंबा निर्यातीकरिता आवश्यक असलेल्या सर्व आंब्यावर करावयाच्या प्रक्रियांचा सुविधा कृषी पणन मंडळाने विकसित केल्या आहेत. या सुविधांचा वापर आंब्यांवर प्रक्रिया करण्यासाठी केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांकडील आंबा निर्यातीस चांगले दर प्राप्त होण्यास मदत होते.

- **संजय कदम**, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-03-04 | Page- 2
epaper.mahamtb.con

# कोथरूड येथील संत्रा महोत्सवास उदंड प्रतिसाद

**पुणे** : 'महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळा'मार्फत कोथरूड येथील गांधी भवनात आयोजित संत्रा महोत्सवास उदंड प्रतिसाद लाभल्याची माहिती पणन मंडळाच्या पत्रकात देण्यात आली आहे.या महोत्सवास नागपूर व अमरावती येथून सात शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ३० शेतकऱ्यांनी आपल्या शेतामधील गोड संत्रा पुणेकरांसाठी महोत्सावाच्या माध्यमातून विक्री केला. पुणेकरांनी या संत्रा महोत्सवास भरघोस प्रतिसाद दिलेला असून असा महोत्सव नियमीत भरविण्यात यावा अशी ग्राहकांनी मागणी केली. 'कृषि पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांचे मार्गदर्शन तसेच देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सुहास काळे, उमेश वाघ,आनंद शुक्ला यांच्या प्रत्यक्ष कामकाजाने महोत्सवाची यशस्वी सांगता झाली.

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास मंगळवारी प्रारंभ

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

आंबा हंगामात ग्राहकांना अस्सल हापूस उपलब्ध व्हावा, आणि शेतकऱ्यांना रास्त दर मिळावा, या उद्देशाने राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या आंबा महोत्सवाला मंगळवारी (ता. १) प्रारंभ होत आहे. मात्र गुढीपाडव्याला ग्राहकांची मागणी वाढल्यामुळे शनिवारी (ता. २९) महोत्सवस्थळी आंब्याची विक्री सुरू झाली आहे. कोकणातून काही शेतकरी दाखल झाले असून, विक्री सुरू केली आहे. महोत्सवात प्रति डझनला साधारण दीड ते दोन हजार रुपये आहेत.

पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी मार्केट यार्ड बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवात १०० पेक्षा अधिक स्टॉल लावण्यात आले असून, हा महोत्सव पुढील एक महिना सुरू असणार आहे. महोत्सवात कोकणातील सिंधुदुर्ग. रत्नागिरी जिल्ह्यांमधून हापूससह केसर आंबा विक्रीसाठी आणला जातो. तसेच पुणे जिल्ह्यातील काही महिला बचत गटाच्या उत्पादन विक्रीसाठी स्टॉल दिले जातात. या वर्षीच्या महोत्सवाला मंगळवारी (ता. १) प्रारंभ होत असला तरी, गुढीपाडव्या निमित्त शनिवार (ता. २९) पासूनच विक्री सुरू झाली आहे.

## या ठिकाणी महोत्सवाचे आयोजन

या वर्षी मार्केट यार्डसह कोथरूड (गांधी भवन), खराडी, मगरपट्टा (हडपसर) या ठिकाणी आंबा महोत्सव होणार असल्याचे सुहास काळे यांनी सांगितले.




**पुणे : ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी यंदा आंबा महोत्सवा क्यूआर कोडची सेवा उपलब्ध करु देण्यात आली आहे.**

Vishweshwar, 01/03/2025

# कोथरूड येथील संत्रा महोत्सवास उदंड प्रतिसाद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.२०/०२/२०२५ ते दि.२६/०२/२०२५ या कालावधीत कोथरूड येथील गांधी भवनात 'संत्रा महोत्सव २०२' चे आयोजन केलेले होते. सदर महोत्सवास नागपूर व अमरावती येथुन ०७ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ३० शेतकऱ्यांनी आपल्या शेतामधील मृग बहारातील चविला गोड संत्रा पुणेकरांसाठी महोत्सावाच्या माध्यमातुन विक्री केला. सदर कालावधीत सुमारे २१ टन संत्रा विक्री झाला असुन, साधारणपणे २२ लाखाची उलाढाल महोत्सावात झाली. संत्र्यासोबत संत्र्याचा फ्रेश ज्युसही विक्रीसाठी उपलब्ध होता. सदर महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८०/- ते रु. १२०/- प्रति किलोनुसार विक्री करण्यात आला.

पुणेकरांनी सदर संत्रा महोत्सवास भरघोस प्रतिसाद दिलेला असुन, असा महोत्सव नियमीत भरविण्यात यावा व पुढिल संत्रा महोत्सवावेळी संत्र्यासोबत संत्रा मुल्यवर्धीत पदार्थ जसे की संत्रा बर्फी, जाम, ज्युस, कॅन्डी, संत्रा सालीपासून बनविण्यात आलेले साबण, सौदर्य प्रसाधने इत्यादीसारखे पदार्थही महोत्सवात समाविष्ठ करावे, असे पुण्यातील ग्राहकांनी मागणी केली. कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संजय कदम, सरव्यवस्थापक श्री. विनायक कोकरे यांचे मार्गदर्शन तसेच देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे श्री. मंगेश कदम, श्री सुहास काळे, श्री. उमेश वाघ आणी श्री. आनंद शुक्ला यांच्या प्रत्यक्ष कामकाजाने महोत्सवाची यशस्वी सांगता झाली.

Rashtraroop, 01/03/2025

# कोथरूड येथील संत्रा महोत्सवास उदंड प्रतिसाद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.२०/०२/२०२५ ते दि.२६/०२/२०२५ या कालावधीत कोथरूड येथील गांधी भवनात 'संत्रा महोत्सव २०२' चे आयोजन केलेले होते. सदर महोत्सवास नागपूर व अमरावती येथुन ०७ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ३० शेतकऱ्यांनी आपल्या शेतामधील मृग बहारातील चविला गोड संत्रा पुणेकरांसाठी महोत्सावाच्या माध्यमातुन विक्री केला. सदर कालावधीत सुमारे २१ टन संत्रा विक्री झाला असुन, साधारणपणे २२ लाखाची उलाढाल महोत्सावात झाली. संत्र्यासोबत संत्र्याचा फ्रेश ज्युसही विक्रीसाठी उपलब्ध होता. सदर महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८०/- ते रु. १२०/- प्रति किलोनुसार विक्री करण्यात आला.

पुणेकरांनी सदर संत्रा महोत्सवास भरघोस प्रतिसाद दिलेला असुन, असा महोत्सव नियमीत भरविण्यात यावा व पुढिल संत्रा महोत्सवावेळी संत्र्यासोबत संत्रा मुल्यवर्धीत पदार्थ जसे की संत्रा बर्फी, जाम, ज्युस, कॅन्डी, संत्रा सालीपासून बनविण्यात आलेले साबण, सौदर्य प्रसाधने इत्यादीसारखे पदार्थही महोत्सवात समाविष्ठ करावे, असे पुण्यातील ग्राहकांनी मागणी केली. कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संजय कदम, सरव्यवस्थापक श्री. विनायक कोकरे यांचे मार्गदर्शन तसेच देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे श्री. मंगेश कदम, श्री सुहास काळे, श्री. उमेश वाघ आणी श्री. आनंद शुक्ला यांच्या प्रत्यक्ष कामकाजाने महोत्सवाची यशस्वी सांगता झाली.

# कोथरूड येथील संत्रा महोत्सवास उदंड प्रतिसाद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.२०/०२/२०२५ ते दि.२६/०२/२०२५ या कालावधीत कोथरूड येथील गांधी भवनात 'संत्रा महोत्सव २०२' चे आयोजन केलेले होते. सदर महोत्सवास नागपूर व अमरावती येथुन ०७ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ३० शेतकऱ्यांनी आपल्या शेतामधील मृग बहारातील चविला गोड संत्रा पुणेकरांसाठी महोत्सावाच्या माध्यमातुन विक्री केला. सदर कालावधीत सुमारे २१ टन संत्रा विक्री झाला असुन, साधारणपणे २२ लाखाची उलाढाल महोत्सावात झाली. संत्र्यासोबत संत्र्याचा फ्रेश ज्युसही विक्रीसाठी उपलब्ध होता. सदर महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८०/- ते रु. १२०/- प्रति किलोनुसार विक्री करण्यात आला.

पुणेकरांनी सदर संत्रा महोत्सवास भरघोस प्रतिसाद दिलेला असुन, असा महोत्सव नियमीत भरविण्यात यावा व पुढिल संत्रा महोत्सवावेळी संत्र्यासोबत संत्रा मुल्यवर्धीत पदार्थ जसे की संत्रा बर्फी, जाम, ज्युस, कॅन्डी, संत्रा सालीपासून बनविण्यात आलेले साबण, सौदर्य प्रसाधने इत्यादीसारखे पदार्थही महोत्सवात समाविष्ठ करावे, असे पुण्यातील ग्राहकांनी मागणी केली. कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संजय कदम, सरव्यवस्थापक श्री. विनायक कोकरे यांचे मार्गदर्शन तसेच देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे श्री. मंगेश कदम, श्री सुहास काळे, श्री. उमेश वाघ आणी श्री. आनंद शुक्ला यांच्या प्रत्यक्ष कामकाजाने महोत्सवाची यशस्वी सांगता झाली.